लोकमत



के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या कार्यक्रमात मंत्री छगन भुजबळ यांचा सन्मान करताना समीर वाघ. समवेत मान्यवर.

# नाशिकनगरीची शैक्षणिक हबकडे वाटचाल : छगन भुजबळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : कर्मवीरांच्या मोठेपणामुळे के.के. वाघसारख्या अनेक शिक्षण संस्था उभ्या राहिल्या आहेत. या संस्था विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याबरोबरच जबाबदार नागरिक घडविण्याचे योगदानही देत आहेत, त्यामुळे नाशिकची वाटचाल शैक्षणिक हबकडे असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री नामदार छगन भुजबळ यांनी केले.

के.के. वाघ शिक्षण संस्था येथे गुरुवारी (दि. २१) आयोजित सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार दिलीप बनकर होते. यावेळी माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, माजी नगरसेवक नाना महाले, डी.के. जगताप, वामन खोसकर, विश्वस्त चांगदेवराव होळकर, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, विलास टर्ले, धनंजय होळकर, सुरेश शेटे, सुरेश भोज आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. के.एन. नांदूरकर यांनी प्रास्ताविक तर प्राचार्य डॉ. भूषण कर्डिले यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी तर अजिंक्य वाघ यांनी आभार मानले.

**कर्मवीरांनी लावलेल्या शैक्षणिक संस्थेचे वटवृक्षात रुपांतर झाले असून, त्या के. के. वाघ शिक्षण संस्थेत हजारो विद्यार्थी आज शिकत आहेत, असे उद्गार मान्यवरांनी काढले.**